# –: श्री. सुभाषराव जोशी यांचा परिचय :–

**नांव** : **सुभाषराव रामचंद्र जोशी**

**पत्ता**

| | | |
|---|---|---|
| **निवास** | : | जोशी बंगला, कार्वेनाका, मार्केटयार्ड, शनिवार पेठ,<br>कराड – ४१५ ११०, जिल्हा : सातारा |
| **ऑफीस** | : | ‘अजंठा ट्रान्स्पोर्ट’, शनिवार पेठ, कराड – ४१५ ११०. |
| **बँक** | : | दि कराड अर्बन को–ऑप. बँक लि. कराड (शेड्यूल्ड बँक)<br>मुख्य कार्यालय : ५१६/२, शनिवार पेठ कराड – ४१५ ११०. |

| | | | |
|---|---|---|---|
| **फोन** | **निवास** | : | ०२१६४–२२२४०४ |
| | **ऑफीस** | : | ०२१६४–२२२५७५, २२२४५५ |
| | **बँक** | : | ०२१६४–२२६०१३, २२६०१७ |
| | **वेब साईट** | : | www.karadurbanbank.com |
| | **इ–मेल** | : | str_karad@sancharnet.in<br>srj@ajantagroup.com |
| | **फॅक्स** | : | ०२१६४ – २२०१२६ |

**जन्मस्थळ व तारीख** : मणेराजुरी, ता.तासगांव, जि.सांगली
दि. १६ मार्च १९४२.

**शिक्षण** : एफ. वाय. बी. एस्. सी.

टिळक हायस्कूल कराड येथे दहावीपर्यंत शिक्षण झाले. भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक येथून दहावीची परीक्षा उत्तीर्ण. यानंतरचे शिक्षण ११ वी, मॉडर्न हायस्कूल पुणे येथे झाले, तर कॉलेज शिक्षण फर्ग्युसन कॉलेज पुणे येथे झाले.

**स्फूर्तीदायक व्यक्ती**

रँगलर आर. पी. परांजपे, कॅप्टन शि. वा. दामले – प्रिन्सिपॉल महाराष्ट्र मंडळ पुणे यांचा सुभाषराव जोशी यांचे जीवनावर बराच प्रभाव आहे.

त्याचप्रमाणे स्व.डॉ. द. शि. एरम व सुभाषराव जोशी यांचे स्नेहबंध सुमारे २५/३० वर्षापासून होते. जीवनाच्या वाटचालीत डॉक्टरांचे स्फूर्तीदायक व्यक्ती, स्नेही, मार्गदर्शक म्हणून अढळ स्थान आहे.

**प्रवास**

व्यवसाय क्षेत्रातील प्रगत ज्ञानाची माहिती घेण्यासाठी युरोप, अमेरिका, पश्चिम एशिया या देशांचा प्रवास. शिवाय संपूर्ण भारत सफर केलेली आहे.

सन १९९२ मध्ये कैलास मानस सरोवर यात्रेत सहभाग. यापूर्वीही जवळपास २०/२२ वेळा हिमालयाच्या पर्वतराजीत प्रवास केलेला आहे.

**भूषविलेली व भूषवित असलेली पदे व पुरस्कार**

- अर्बनकुटुंबप्रमुख
- निष्णात व्यावसायिक.
- माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि., कराड (शेड्यूल्ड बँक)
- चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, अजंठा युनिव्हर्सल फॅब्रिक्स लि., कराड
- सचिव, लायन्स अपंग सहाय्य संस्था कराड
- सदस्य, अर्बन सामाजिक कृतज्ञता न्यास, कराड
- संस्थापक संचालक, दि कराड अर्बन मध्य.सह.ग्राहक संस्था मर्या., कराड
- झोन चेअरमन, नॅशनल एग को-ऑर्डीनेशन कमिटी.
- संस्थापक सदस्य, लायन्स क्लब ऑफ कराड.
- कऱ्हाड नगरीत सन २००२ मध्ये संपन्न झालेल्या ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून निवड.
- कऱ्हाड नगरीत सन २००३ मध्ये संपन्न झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवड.
- सहकार खात्याने नुकतीच Think Tank ची स्थापना नुकतीच केली आहे. सदर थिंक टँकवर 'विशेष निमंत्रित' म्हणून निवड.
- सन २००८ मध्ये कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापूर तर्फे समर्पित भावना असलेले नागरी सहकारी बँकांतील 'सर्वोत्कृष्ट आदर्श संचालक' पुरस्काराने सन्मानित.

**वाहतूक क्षेत्र**

सन १९६० साली वाहतूक क्षेत्रात ट्रक ड्रायव्हर म्हणून पदार्पण. अल्पावधीतच अजंठा ट्रान्स्पोर्टमध्ये कै. भीमराव नारायण जाधव यांचे भागीदार म्हणून सहभाग. अजंठा ट्रान्स्पोर्टने वाहतूक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे व अजंठा हे नाव सर्वांनाच सुपरिचित आहे. गेली ४०-४५ वर्षे ही भागीदारी अबाधित आहे. इतकेच नव्हे तर, पुढच्या पिढीतही ही भागीदारी अबाधित आहे. त्याचप्रमाणे सन १९६८ मध्ये मोबाईल क्रेन सुविधा अजंठाने उपलब्ध करून दिली आहे. पुणे ते बेंगलोर दरम्यान फक्त कराड येथे अशी सुविधा प्रथम उपलब्ध करून देण्याचा मान अजंठा टान्स्पोर्टला जातो.

**पोल्ट्री व्यवसाय**

सन १९८३ पासून पोल्ट्री व्यवसायास सुरवात केली. सध्या या पोल्ट्रीत ६० हजार पेक्षा जास्त पक्षांचे संगोपन केले जाते. विशेष बाब म्हणजे पोल्ट्रीमधील सर्व कामे ॲटोमेटीक होतात. सुभाषराव जोशी यांनी प्रयत्नपूर्वक ॲटोमेटीक वॉटर व खाद्य प्रणाली विकसित केली आहे. तसेच, पक्षांच्या वाहतुकीसाठी स्वयंचलित कन्व्हेअर्स आणि अटोमेटीक एग्ज कलेक्शन सिस्टीमसुद्धा विकसित केली असून या सर्व प्रणालींचे उत्पादनही केले जाते.

१०० % रॅट प्रुफींग ही गोष्ट अतिशय अवघड. परंतु, रॅट प्रुफींगवर संशोधन करून रॅट प्रुफींग इन पोल्ट्री हाऊसेस या विषयावर प्रथम प्रबंध लेखन केले. इंग्लंडमधून प्रसिद्ध होणाऱ्या वर्ल्ड पोल्ट्री या मॅगेझिनने १००० डॉलर्सचे मानधन देऊन १५६ देशात या लेखास प्रसिद्धी दिली. त्याचप्रमाणे, ही सिस्टिम आजही मोठ्या प्रमाणांवर वापरली जाते आणि लोकप्रियही आहे.

आज अनेक पोल्ट्रीमधून वरील सिस्टिम्स कार्यरत आहेत. यामुळे खर्चात बचत होऊन उत्पादनखर्चावर नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे.

**अर्थमूव्हींग इक्विपमेंटस्**

कराड आणि परिसरात प्रथम वे-ब्रिजची उभारणी केली. कालानुरूप त्यामध्ये सुधारणा करत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून १६ मीटर लांब व ३ मीटर रूंदीचा ६० टनी वजन काट्याची उभारणी केली आहे.

त्याचप्रमाणे २ ते ७० टन या प्रकारातील वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण क्रेन, जे.सी.बी., रोलर इत्यादी विविध इक्विपमेंट अर्थमूव्हींग डिव्हीजनकडे उपलब्ध आहेत.

**टेक्सटाईल व्यवसाय**

सन १९९९ साली युनिव्हर्सल फॅब्रिक्स हे टेक्सटाईल युनिटची स्थापना केली. इंडस्ट्रिअल फॅब्रिक्सचे उत्पादन आणि निर्यात या उद्देशाने हे युनिट सुरू केले. या युनिटची प्रगती नेत्रदीपक असून युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलियामध्ये त्याची निर्यात केली जाते.

**कराड अर्बन बँक**

सुभाषराव जोशी २५ वर्षापूर्वी कऱ्हाड येथील प्रतिष्ठित अशा दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदी पहिल्यांदी प्रचंड बहुमताने निवडून आले. बँकेचे अध्यक्षपद त्यांनी सन १९९४ ते सन१९९९ या कालावधीत भूषविले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाची आर्थिक उन्नती साधण्याची आणि मध्यमवर्गाला दिलासा देण्याची त्याचप्रमाणे सुशिक्षित बेकार आणि समाजातील पिडित व शोषित वर्गाशी जवळीक साधण्याची संधी या संस्थेमार्फत त्यांना प्राप्त झाली. बँकेने अर्थकारण करतांना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाभिमुख कार्य केले आहे. बँकेने १९९१ सालापूर्वीच सर्व शाखांचे संगणकीकरण पूर्ण केले. संगणकीकरणाचे शिल्पकार म्हणून त्यांना ओळखले जाते. बँकेच्या सर्वांगीण नेत्रदीपक प्रगतीमुळे बँकेस रिझर्व्ह बँकेने दि.२९ जानेवारी २००० रोजी 'शेड्यूल्ड' दर्जा देऊन सन्मानित केले. नुकतीच श्री पार्श्वनाथ सहकारी बँक विलीन करून बँकेने यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. सध्या बँकेचा एकूण व्यवसाय सुमारे रू.१३०० कोटी आहे.

**कराड अर्बन बझार**

ग्राहकांची गरज ओळखून त्यांना उत्तम दर्जाच्या, निर्भेळ वस्तूंचा पुरवठा रास्त किंमतीत आणि एकाच छत्राखाली व्हावा यासाठी 'दि कराड अर्बन मध्य. सह. ग्राहक संस्थेची स्थापना १९९१ साली करणेत आली. अर्बन बझारचे संस्थापक संचालक म्हणून आणि नंतर अध्यक्ष म्हणून सुभाषराव जोशी यांनी काम पाहिले.

**सामाजिक कार्य**

**मूक बधिर विद्यालय**

मूक बधिर विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी ओळखून १९७७-७८ च्या सुमारास लायन्स क्लब, कराडचे माध्यमातून बहिरेपणा इत्यादी वरील मोफत चिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन डॉ. द. शि. एरम यांचे कल्पनेतून होऊ लागले. अशा विद्यार्थ्यांच्या जीवनास एक नवी दिशा द्यावी आणि समाजामध्ये त्यांना मानाने जगता यावे या विचारातून 'मूकबधिर विद्यालयाची' कल्पना पुढे आली आणि १९८२ साली मूकबधिर शाळा सुरू केली. या संस्थेच्या प्रगतीमध्ये सुभाषराव जोशी यांचा मोलाचा वाटा आहे. आज लायन्स अपंग सहाय्य संस्थेच्या माध्यमातून 'मूक बधिर विद्यालय व वसतिगृह' ही संस्था अतिशय चांगल्या प्रकारे मूकबधिरांना प्रशिक्षित करत आहे. आज या संस्थेत १२० विद्यार्थी शिक्षण घेत असून पैकी ६० विद्यार्थ्यांची वसतिगृहात सोय केली आहे. साऊंड प्रुफ रूम, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह, डायनिंग रूम, रेक्टर निवास, भव्य क्रीडांगण, विविध तांत्रिक कार्यशाळा इ. विविध विभाग अत्याधुनिक साधनसामुग्रीने सज्ज आहेत. 'मुक्याना वाचा आणि बहिऱ्यांना कान' देणारी ही शिक्षण व्यवस्था काळाची मोठी गरज आहे.

**अर्बन सामाजिक कृतज्ञता न्यास**

बँकेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत असतांना बँकेच्या सभासदांना आरोग्यविषयक येणाऱ्या अडचणी पाहून त्यांना यथाशक्ती आर्थिक मदत करता यावी आणि सभासदांसाठी सुसज्ज डायग्नोसिस सेंटर उभे करावे या उद्देशाने १९९५ साली 'दि कराड अर्बन सामाजिक कृतज्ञता न्यास' या संस्थेची स्थापना केली गेली. ही संकल्पना डॉ.द.शि.एरम व सुभाषराव जोशी यांची. या न्यासाच्या उभारणीतही त्यांचे योगदान महत्वाचे आहे. आजवर अनेक सभासदांना त्यांच्या आरोग्यविषयक अडचणीमध्ये आर्थिक हातभार लावून मदत केली आहे. विशेषत्वाने नमूद करणेची बाब म्हणजे बँकेच्या सभासदांनी या उपक्रमास उत्स्फूर्तपणे आपणांस मिळाणाऱ्या लाभांशापैकी ३ % रक्कम देऊ केली आहे.

**राजकीय कार्य**

कऱ्हाड शहरातील व ग्रामीण परिसरातील युवकांशी प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि आत्मीयतेचे संबंध निर्माण करून या युवाशक्तीला संजय गांधी योजनाद्वारे मिळणाऱ्या निरनिराळ्या सोयींचा फायदा व संधी उपलब्ध करून दिलेली आहे. एक आग्रही, समतोलित आणि

संवेदनशील नेतृत्व असे व्यक्तिमत्व आज त्यांच्या रूपाने युवाशक्तीला मार्गदर्शन करीत आहे. तरूणापासून वृध्दांपर्यत खेळीमेळीने वागणारा समाजातील सर्व घटकांशी समरस होणारा संघटक कुशल मार्गदर्शक, निरपेक्ष समाजसेवक आणि अजातशत्रू अशी त्यांची ख्याती आहे.

* * * *